तरुण भारत संवाद

शनिवार १३ सप्टेंबर २०२५

# 'स्वामी विवेकानंद यांचे विचार आत्मसात करा'

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थ्यांनी सेवाभाव व बंधूभाव समोर ठेवून कार्य करावे. स्वत:मध्ये नेतृत्वगुण विकसीत करावेत. स्वामी विवेकानंदांचे आचार व विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत व आपल्या देशाची अधिक विकास करावा, असे मत विवेकानंद केंद्राचे संचालक अरुण कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्घाटन प्रसंगी व विश्वबंधूता दिना निमित बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते.

कुंभार म्हणाले, महाविद्यालयाचे काम करत समाजापर्यंत पोहोचण्यासाठी रा.से.योजनेचे कार्य उपयोगी पडते. एन.एस.एस. च्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वयंशिस्त निर्माण् होते. माणसाला माणसाशी माणसासारखे जगायला एन.एस.एस. शिकवते. बलवान राष्ट्राची निर्मिती युवा शक्तीद्वारे केली जाते. स्वागत व प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. टी. दांगट यानी केले. डॉ. जी. एस. उबाळे व प्रा. हेमंत पाटील यांनी आभार मानले. प्रा. डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. संदीप पाटील, प्रा. प्रविण बागडे, डॉ. राजश्री पाटील, स्वयंसेवक उपस्थित होते.

पुण्य नगरी
शनिवार, १३ सप्टेंबर २०२५

# प्रा. सुप्रिया पाटील यांना पीएच.डी.

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या (अधिकारप्रदत्त स्वायत) प्रा. सुप्रिया मोहन पाटील यांना शिवाजी विद्यापीठाकडून नुकतीच इंग्रजी विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली. त्यांच्या 'फॉर्म अॅज स्टेटमेंट : ए स्टडी ऑफ नरेटिव्ह स्ट्रक्चर्स अँड स्ट्रॅटेजिज इन अनिता नायर्स सिलेक्टेड नॉव्हेल्स' या प्रबंधास शिवाजी विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली. यासाठी त्यांना प्रा. डॉ. तृप्ती करेकट्टी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांना कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे आणि मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले.



## संक्षिप्त

# 'सेवा, बंधुभाव ठेवून राष्ट्रीय सेवा योजनेत काम करावे'

**कोल्हापूर :** राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थ्यांनी सेवाभाव व बंधुभाव समोर ठेवून कार्य करावे. स्वत:मध्ये नेतृत्वगुण विकसित करावेत. एनएसएसच्या माध्यमातून मानसिक, बौद्धिक, सामाजिक विकास होतो, असे प्रतिपादन विवेकानंद केंद्राचे संचालक अरुण कुलकर्णी यांनी केले. विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. अध्यक्षीय मनोगतात प्राचार्य डॉ. कुंभार म्हणाले, महाविद्यालयाचे काम करत समाजापर्यंत पोहोचण्यासाठी रा. से. योजनेचे कार्य उपयोगी पडते. माणसाला माणसाशी माणसासारखे जगायला एन.एस.एस. शिकवते. पार्थ जाधव व श्वेता पाटील या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. बी. टी. दांगट यांनी प्रास्ताविक केले. डॉ. जी. एस. उबाळे, प्रा. हेमंत पाटील यांनी आभार मानले. प्रा. डॉ. संपदा टिपकुर्ले यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी डॉ. संदीप पाटील, प्रा. प्रवीण बागडे, डॉ. राजश्री पाटील, डॉ. जी. एस. उबाळे उपस्थित होते.

# पंचगंगा नदी घाटावर स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गणेश उत्सवातील घरगुती गणेश विसर्जनानंतर घाटावरचे पाणी कमी झाल्याने काही गणपती मूर्ती घाटावर दिसू लागल्या होत्या. हिंदुत्ववादी संघटनांनी जबाबदारी स्वीकारून सलग दोन दिवस पंचगंगा नदी घाटावर स्वच्छता मोहीम राबवून नदी घाट पूर्ण स्वच्छ केला.

या स्वच्छता मोहिमेत कोल्हापुरातील हिंदुत्ववादी संघटना, पंचगंगा आरती महामंडळ, बुधवार पेठेतील नागरिक व महावीर कॉलेज (एनएसएस विभाग), राजाराम कॉलेज, विवेकानंद कॉलेज (एनएसएस विभाग), शहाजी कॉलेजचे (एनसीसी विभाग) विद्यार्थी तसेच कोल्हापूर महानगरपालिकेचे कर्मचारी हेदेखील सहभागी झाले होते.



**कोल्हापूर : पंचगंगा नदी घाटावर विविध संघटनांच्या वतीने दोन दिवस स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.**

यावेळी सुशील भांदिगरे, महेश कामत, दीपक देसाई, सुधाकर भांदिगरे, पप्पू शेठ, राजेंद्र बुचडे, चंद्रकांत हंडे, गणेश जाधव, कपिल सूर्यवंशी, शशिकांत जाधव, संदीप कुंभार आदी उपस्थित होते.